मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ठेकेदारांचा निष्काळजीपणा; नागरिकांचा जीव धोक्यात!

## किवळे-निगडी उड्डाणपुलावरील प्रकार, उद्घाटनाच्या घाईमुळे केल्या 'या' चुका

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी ते किवळे या बीआरटी मार्गावर उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या उद्घाटनाच्या घाईत अनेक चुका झाल्या आहेत. त्यातील एक म्हणजे या पुलावर लावण्यात आलेले दिशादर्शक हे धोक्याचे अन् जीवघेणे ठरणार आहेत. कारण, हे उभारण्यासाठी ठेकेदाराने निष्काळजीपणा दाखवत दोनच बोल्टवर उभे केले आहे. भविष्यात ते पडून अपघात होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या परिसरातील एका दक्ष नागरिकाने ही समस्या निदर्शनास आणून दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने निगडीच्या भक्ती-शक्ती चौकापासून ते किवळे येथील मुकाई चौकापर्यंतचा बीआरटी मार्ग विकसित करीत आहे. यामुळे निगडी, आकुर्डी, भोसरी एमआयडीसी व आसपासच्या परिसरातील नागरिकांना महामार्गाकडे व किवळेला लवकर पोहोचता येईल. दरम्यान हा मार्ग व उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर विविध कारणांनी व असंख्य चुकांमुळे नागरिकांकडून त्यावर टीका होत आहे.

प्रत्यक्षात हा मार्ग गेली आठ वर्ष रखडला होता. जागा ताब्यात न घेता महापालिकेने थेट बीआरटी मार्गाचे काम सुरू केले. त्यामुळे त्याला विरोध झाला होता. अखेर या ४५ मीटर रुंद मार्गाचे काम जानेवारी महिन्यात पूर्ण झाले आहे. या मार्गासाठी ८७ कोटी रुपये खर्च झाला. मात्र, हा पूल सुरू करण्याचे नादात व लवकर उद्घाटन उरकरण्यासाठी ठेकेदाराकडून चुका झाल्या आहेत. त्यामुळे त्या निस्तरण्याची वेळ महापालिकेवर आली आहे. अद्यापही या रस्त्याचे काम अपूर्ण आहे. तसेच बीआरटी देखील अद्याप सुरू नाही. रावेतकडील जागा ताब्यात नसल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. किवळेपासून उड्डाणपूल सुरू होताना ठिकाणी चुकीचे वळण केल्याने अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे.



दरम्यान या बापदेव महाराज पुलावर दोन्ही बाजूला उभारण्यात दिशादर्शक धोकादायक ठरू लागले आहेत. दिशादर्शक उभारण्यासाठी चार ठिकाणी स्क्रू- बोल्ट लावणे आवश्यक आहे. मात्र, केवळ दोनच बोल्टवर हा दिशादर्शक उभा केला आहे. स्थानिक नागरिक प्रवीण पाटील यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली. तो दिशादर्शक हलत असून, भविष्यात हवेने पडून अपघात होऊ शकतो. तर, खाली पडून दुचाकीस्वार अथवा पादचारी व्यक्तीला मोठी इजा होऊ शकते. मात्र त्या दृष्टीने एकही अधिकारी अथवा संबंधित ठेकेदाराने त्याकडे पाहिले नाही. केवळ काम उरकायचे या नादात तसाच बोल्ट ठेवला आहे. एक-दोन नव्हे तर या ठिकाणी उभ्या करण्यात आलेले बहुतांश दिशादर्शकांची ही स्थिती आहे. त्यामुळे हा उड्डाणपूल नागरिकांच्या विषयास चर्चेला ठरला आहे.

### वाहतूक कोंडीचा नागरिकांना प्रचंड त्रास

रावेत येथील उड्डाणपूल खुला झाल्यानंतर किवळेतील बापदेव महाराज पुलाखालील वाहतूक कोंडीमध्ये भर पडली आहे. त्यामुळे, वाहनचालक पुरते त्रस्त झाले आहेत. यामुळे वरचेवर छोटे-मोठे अपघात देखील होत आहेत. वाहतूक नियंत्रित करताना स्थानिक वाहतूक पोलिसांच्या अपुरी पडत आहे. कोंडी होणार नाही, यादृष्टीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी किवळे रावेत सोसायटीचे पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# श्रीरंग बारणेंचे विधान बालिशपणाचे

## महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांची श्रीरंग बारणेंवर जहरी टीका

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभेच्या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजय वाघेरे यांच्यात आरोप प्रत्यारोपचा कलगीतुरा रंगला आहे. माझ्या विरोधात कोण उमेदवार आहे, हे मला माहीत नाही, असे विधान श्रीरंग बारणे यांनी केल्यानंतर संजोग वाघेरे यांनी देखील श्रीरंग बारणे यांना रावणाची उपमा देत त्यांचा अहंकाराचा मतदारच अंत करतील अशी जहरी टीका केली आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे हे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मावळ लोकसभा मतदारसंघात सध्या महाविकास आघाडी आणि महायुतीचा जोरदार प्रचार सुरू आहे. दोन्ही उमेदवार एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. नुकतीच महायुतीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत घटक पक्षाचे शहराध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बारणे यांनी माझ्या विरोधात कोण उमेदवार आहे. हे मला माहीत नाही, असं विधान करत उमेदवारी



अर्ज भरल्यानंतरच मला उमेदवार कळेल असं वक्तव्य केलं होतं. यावरूनच महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी श्रीरंग बारणे यांच्यावर जहरी टीका केली आहे.

श्रीरंग बारणे यांचे विधान हे बालिशपणाचे असून १९८७ पासून मी राजकारणात आणि समाजकारणात कार्यरत आहे. आम्ही दोघेही एकाच मतदारसंघात राहात आहोत, तरी ते मला ओळखत नसतील तर तो त्यांचा अहंकार आहे. वाघेरे यांनी रावणाचे उदाहरण देत "रावणाचादेखील अहंकार जळून खाक झाला होता. रावणाची लंका शेवटी जळाली होती हे बारणेंनी विसरू नये. त्याचप्रमाणे श्रीरंग बारणेंचा अहंकाराचा मतदार अंत करतील", असा विश्वास संजोग वाघेरे यांनी व्यक्त केला.

# रेल्वे प्रवाशांची रोजचीच लढाई!

## तिकीट आरक्षित करूनही प्रवाशांना गर्दीमुळे गाडीत चढता येईना : प्रवाशांचे हाल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळी सुट्यांमुळे सध्या त्यात आणखी भर पडली आहे. तिकीट आरक्षित करूनही प्रवाशांना गर्दीमुळे गाडीत चढता येत नसल्याचे चित्र अनेक वेळा दिसत आहे. रेल्वे प्रशासन आणि रेल्वे सुरक्षा दलाकडून गर्दीचे नियोजन केले जात नसल्याने स्थानकावर गोंधळाचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत.

पुणे विभागात सर्वाधिक प्रवासी संख्या पुणे स्थानकावर आहे. पुणे विभागातील प्रवाशांची संख्या एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत सुमारे साडेपाच कोटी होती. यातील जवळपास निम्मी म्हणजे सव्वादोन कोटी प्रवासी संख्या पुणे स्थानकावरील आहे. सध्या उन्हाळी सुट्यांचा हंगाम असल्याने रेल्वेकडून अनेक विशेष गाड्या सोडल्या जात आहेत. या गाड्या प्रामुख्याने उत्तरेकडे जाणाऱ्या आहेत. त्यांना मोठ्या प्रमाणात गर्दी होताना दिसत आहे. अनेक वेळा आधी तिकीट आरक्षित करून गाडीमध्ये चढता न आल्याचा अनुभव अनेक प्रवासी मांडत आहेत.

पुणे स्थानकावर रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांकडून गर्दीचे नियोजन केले जाते. प्रत्यक्षात गाडी फलाटावर आल्यानंतर काही काळ हे जवान असतात. ते प्रवाशांच्या रांगा लावून निघून जातात. जवान निघून गेल्यानंतर गोंधळाला सुरुवात होते आणि प्रवासी एकदम गर्दी करून गाडीत घुसण्यास सुरुवात करतात. यामुळे अनेक प्रवाशांना तिकीट असूनही गाडीत बसता येत नाही. यामुळे त्यांना गाडी तिथून जाताना हताशपणे पाहावे लागते. अनेक विनातिकीट प्रवासी दमदाटी करून गाडीत घुसतात, असाही अनेक प्रवाशांचा अनुभव आहे.



> रेल्वे स्थानकावर गाडीत चढताना गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आरक्षित तिकीट असूनही पुणे-दानापूर गाडीत प्रवाशांना बसता आले नाही. मात्र, तिकीट नसलेले प्रवासी गाडीत घुसले. रेल्वे प्रशासनाकडून यावर काहीच पावले उचलण्यात आली नाहीत.
> **- अरविंद सिंग, प्रवासी**

**गाडी सुटण्याच्या वेळेनंतर रद्द**

पुणे ते सातारा डेमू ही गाडी रविवारी सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी सुटणार होती. विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी प्रत्यक्षात आज सकाळी ८ वाजून १ मिनिटाने ही गाडी रद्द केल्याचे समाज माध्यमावर जाहीर केले. गाडी सुटण्याच्या सुमारे दोन तासांच्या कालावधीनंतर गाडी रद्द करण्यात आल्याची घोषणा करण्यात आल्याने प्रवाशांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

**वारंवार गाड्यांना विलंब**

हावडा-पुणे आझाद हिंद एक्स्प्रेस या गाडीला वारंवार विलंब होत आहे. याचबरोबर जबलपूर-पुणे, पुणे ते जम्मू तावी झेलम एक्स्प्रेस, गोरखपूर-पुणे या गाड्यांनाही विलंब होत आहे. या गाड्यांना काही वेळा तब्बल १० तासांपर्यंत विलंब होत आहे. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

# बांधकाम विभागाचा पूर्णत्वाचा दाखला, कर आकारणी सुरु

## करसुलभतेसाठी महापालिका आयुक्तांची सूचना, मिळकतदारांची होणार सोय

**पुणे | प्रतिनिधी**

बांधकाम प्रकल्पाला महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर तत्काळ त्याची नोंदणी करून मिळकत विभागाने कर आकारणी करावी अशा सूचना महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिल्या आहेत.

बांधकामांना पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर मिळकतकरासाठी काही वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे सदनिका अथवा घरमालकांना एकदम कर आकारणी केली जाते, त्यामुळे अचानक लाखो रुपयांचा कराचा भुर्दंड त्यांना सोसावा लागतो. एवढी मोठी रक्कम एकाच वेळी भरणे सर्वसामान्य नागरिकाला शक्य होत नाही. त्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढत चालले असून यात पालिकेचे नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी तसेच नागरिकांनाही कर सुलभपणे भरता यावा, यासाठी बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाली की तत्काळ कर आकारणीस सुरुवात करावी, अशी मागणी मिळकतदारांनीच केली होती. त्यावर महापालिका प्रशासनाकडून विचार केला जात होता. अखेर पालिका आयुक्तांनी मिळकत कर विभागाला सूचना दिल्या आहेत.

बांधकामाला पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर मिळकतकराची आकरणी करण्यासाठी एक ते तीन वर्षांचा कालावधी लागत असल्याचे समोर आले आहे. बांधकाम विभागाकडून मिळकतकर विभागाकडे पूर्णत्वाचा दाखला आल्यानंतर तत्काळ करआकारणी करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सध्याच्या पध्दतीनुसार करआकारणी करत असताना प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली जाते. याला वेळ लागत असल्याचे आयुक्त भोसले यांनी सांगितले . बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बांधकाम व्यावसायिकाच्या सदनिका विकल्या की नाही हा संबंधितांचा प्रश्न आहे. ज्याच्या ताब्यात सदनिका असेल त्याच्यावर कराची आकारणी होणार असून कोणत्याही प्रकारची सूट मिळणार नसल्याचे भोसले यांनी सांगितले.



शहरात मोठ्या प्रमाणात प्रत्येक वर्षी बांधकामांना परवानगी देण्यात येते. यामधून कोट्यवधी रुपयांचा महसूल बांधकाम विभागाला मिळतो. मात्र करआकारणी करण्यासाठी दोन ते तीन वर्षांचा कालावधी जातो. यामागे बांधकाम व्यावसायिक आणि करआकारणी विभागाचे साटेलोटे असल्याचे बोलले जाते. तत्काळ करआकारणी झाल्यास संबंधित बांधकाम व्यावसायिकाला सदनिकाचा कर भरावा लागतो. यानंतर सदनिका विकल्यानंतर तो कर संबंधित मालकाला भरावा लागतो. अनेक वेळा थकलेल्या कराचा भुर्दंड सदनिका खरेदीदारालासुध्दा भरावा लागत आहे.

सदनिका खरेदी करताना सर्व कर भरले आहेत, का याची माहिती सदनिका खरेदीदारांनी घ्यावी, असे आवाहन आयुक्त भोसले यांनी केले. तसेच मुद्रांक शुल्क नोंदणी विभागाने पालिका करासंदर्भात ना हरकत घ्यावी, अशी विनंती पालिका प्रशासनकडून केली जाईल. असेही त्यांनी सांगितले.

# धक्कादायक! वर्षभरात 602 बालकांचा मृत्यू

## सहा वर्षांत तब्बल 3 हजार 305 बालकांचा मृत्यू : बालमृत्यूचे भीषण वास्तव आले समोर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात बालमृत्यूचे भीषण वास्तव समोर आले आहे. महापालिकेच्या रुग्णालयात नवजात बालकांमध्ये प्रामुख्याने संसर्गजन्य रोग, अपघात, श्वसनमार्गाचे रोग, जन्मजात विसंगती यासह न्यूमोनिया, डायरिया या आजारांनी बालकांचे मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. महापालिकेच्या रुग्णालयासह खासगी रुग्णालयात ० ते ५ वयोगटातील वर्षभरात ६०२ आणि सहा वर्षांत तब्बल ३ हजार ३०५ बालकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे बालकांचे होणारे मृत्यू ही चिंतेची बाब बनली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची शहरात १० रुग्णालये आणि २८ दवाखाने आहेत. यामध्ये सर्वात मोठे ७०० बेडचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह शंभरहून अधिक बेडची जिजामाता रुग्णालय, थेरगाव रुग्णालय, आकुर्डी आणि भोसरी अशी मोठी रुग्णालये आहेत. याशिवाय आठ प्रसूतिगृहे, झोपडपट्ट्यांमध्ये २० आरोग्य केंद्र आहेत. ८ कुटुंब नियोजन केंद्र, ३८ लसीकरण केंद्र आहेत.

शहरात महापालिकेकडून रुग्णालये व दवाखान्यातून गर्भवती महिलांना वैद्यकीय सेवा पुरवली जाते. माता बालसंगोपन आणि जन्मजात अर्भके, बालकांसाठी विविध सेवा, सुविधा पुरविल्या जातात. शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या आसपास आहे, तर जिल्ह्यातील चाकण, शिरूर, मावळ यासह अन्य भागातून महिला पालिकेच्या रुग्णालयात गरोदर माता उपचारासाठी शेवटच्या टप्प्यात येतात. त्यामुळे बालमृत्यूची आकडेवारी वाढल्याचे दिसून येत आहे.

गेल्या वर्षभरात उद्योगनगरी असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील महापालिका रुग्णालयांसह खासगी रुग्णालयात ० ते ५ वयोगटातील ६०२ तर सहा वर्षांत ३ हजार ३०५ बालकांचा मृत्यू झाला आहे. तसेच २०२२ मध्ये ४८८ बालकांचा मृत्यू झाला, तर २०२३ मध्ये मोठी वाढ होऊन हा आकडा ६०२ वर गेला आहे. गर्भवती महिला आणि प्रसूती दरम्यान माता मृत्यूचे प्रमाण नगण्य असले तरी त्यानंतर होणारे मुलांचे मृत्यू मात्र चिंतेची बाब आहे.




### या कारणांनी होतोय बालकांचा मृत्यू

महापालिका रुग्णालये आणि खासगी रुग्णालयात बालकांचे झालेल्या मृत्यू हा चिंतेचा विषय बनला आहे. या बाल मृत्यूमागे अनेक कारणे आहेत. मातांना गरोदरपणात योग्य आहार न मिळाल्याने कमी वजनाची बाळे जन्माला येणे, कधी-कधी जास्त वजनांची बाळे जन्माला आल्याने अशा बाळांना मृत्यू होतोय, नवजात बालकांमध्ये प्रामुख्याने संसर्गजन्य रोग, अपघात, श्वसनमार्गाचे रोग, जन्मजात विसंगती ही कारणे दिसून येतात. न्यूमोनिया, डायरिया या आजारांनी देखील बालकांचे मृत्यू होतात. त्याचबरोबर जन्मजात अनेक वेळा बाळांचा मृत्यू झालेला आहे. काही वेळेला बाळाला वेळेवर उपचार न मिळाल्याने जीव गमावण्याची वेळ आली आहे.

> बालमृत्यू रोखण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्न करत आहे. पालिकेच्या वायसीएमसह, थेरगाव, आकुर्डी, जिजामाता, भोसरी रुग्णालयात एनआयसीयू विभाग सुरू केले आहेत. प्रत्येक रुग्णालयात बालरोगतज्ज्ञही उपलब्ध आहेत. आशा, एएनएम, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्यामार्फत गरोदर मातांचे पहिल्या तीन महिन्यात नाव नोंदणी केली जाते. बाळ जन्माला आल्यापासून १ वर्षापर्यंत घरी भेटी देऊन तपासणी, लसीकरण केले जाते. यासाठी आशा एएनएम, वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.
>
> **- डॉ. अभयचंद्र दादेवार, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# खासदार बारणेंच्या 'हॅटट्रिक'चा महायुतीचा निर्धार

## खासदार बारणेंची आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह मान्यवरांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी-मनसे-आरपीआय-रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज खोपोली शहरातील शिवसेना व भाजप कार्यालयांसह शहरातील विविध मान्यवरांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी विक्रमी मताधिक्यसह खासदार बारणे यांच्या हॅटट्रिकचा निर्धार महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केला.

खासदार बारणे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्यासह खोपोलीत मान्यवरांच्या भेटीगाठी घेतल्या. शिवसेना कार्यालयात शहर प्रमुख संदीप पाटील, समन्वयक राजू गायकवाड संघटक तात्या रिठे, माजी उपनगराध्यक्ष मोहन अवसरमल, महिला आघाडी प्रमुख प्रिया जाधव, उद्योग सेनेचे जिल्हाप्रमुख हरेश काळे, सल्लागार अरुण पाटील, युवा सेनेचे जिल्हा सचिव सिद्धांत शेलार, कार्याध्यक्ष अनिल मिंडे, उपशहर प्रमुख निखिल पाटील, शिवसेना उपशहर प्रमुख मोहसीन शेख, कृष्णकांत विचारे, संपर्कप्रमुख प्रसाद वाडकर आधी पदाधिकारी व शिवसैनिकांनी फटाके वाजून खासदार बारणे यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

भाजप कार्यालयात शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, इंदरशेठ खंडेलवाल, विजय तेंडुलकर, हेमंत नांदे, शोभाताई काटे, डॉ. बबनराव नागरगोजे, रामू पवार, सुनील नांदे यांनी खासदार बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी खासदार बारणे यांना तिसऱ्यांदा निवडून देण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी केला.




खोपोलीतील आतिकभाई खोत यांच्या घरी मुस्लिम बांधवांनी खासदार बारणे यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यावेळी अशपाकभाई लोगडे, निजाम जळगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार बारणे व आमदार थोरवे यांनी यावेळी मुस्लिम बांधवांशी संवाद साधला.

माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, रामदास शेंडे तसेच इब्राहिम पाटील, यशवंत साबळे, आरपीआय आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड आदींची खासदार बारणे यांनी भेट घेतली. सर्व ठिकाणी बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# उद्योगांना पूरक पायाभूत सुविधांची बोंब!

## जिल्ह्यात अद्याप स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विमानतळ उभे राहू शकलेले नाही

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील प्रमुख औद्योगिक उत्पादन केंद्र, माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र असा नावलौकिक असलेल्या पुण्यात उद्योगांना पूरक अशा अनेक पायाभूत सुविधा अद्याप उभारणीच्या प्रतीक्षेत आहेत. उद्योगाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाच्या असलेल्या या जिल्ह्यात अद्याप स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विमानतळ उभे राहू शकलेले नाही, अशी अवस्था आहे. राज्यकर्त्यांनी आता घोषणांच्या पलीकडे जाऊन उद्योगांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष द्यावे, अशी उद्योग क्षेत्राची मागणी आहे.

पुण्याचे भौगोलिक स्थान अतिशय महत्त्वाचे असून, पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी पुणे हे जवळचे मोठे केंद्र ठरते. त्यामुळे पुण्यात होणारी गुंतवणूकही मोठी आहे. रोजगाराच्या निमित्ताने पुण्यात होणारे स्थलांतरही अधिक आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रातून पुन्हा एकदा दीर्घ काळ प्रलंबित असलेल्या मागण्या तडीस लावण्याचा सूर उमटू लागला आहे. अनेक उमेदवारांकडून या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दलही उद्योग क्षेत्रात नाराजी आहे.

पुणे जिल्ह्यात पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव, रांजणगाव, बारामती, भिगवण, इंदापूर, जेजुरी, कुरकुंभ, खेड या औद्योगिक वसाहतींसह हिंजवडी आयटी पार्क आणि खराडी नॉलेज पार्क आहे. यात औद्योगिक उत्पादनांपासून माहिती तंत्रज्ञान उद्योगांचा समावेश आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होत आहे. प्रत्यक्षात या औद्योगिक वसाहती पाहिल्यास तेथे रस्त्यांपासून पायाभूत सुविधांपर्यंत सगळ्याचीच दुरवस्था झाली आहे. त्याकडे स्थानिक प्रशासन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्यासह लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष होत आहे.

लघु व मध्यम उद्योगांचा विचार करता सर्वांत जास्त नोंदणीकृत उद्योग पुण्यात आहेत. पुण्यातील उद्योगांच्या पुरवठा साखळीत हे लघु व मध्यम उद्योग महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. तसेच, त्यांच्याकडून होणारी निर्यातही मोठी आहे. असे असताना उद्योगांच्या वाढीसाठी ठोस पावले उचलली जाताना दिसत नाहीत, अशी खंतही उद्योजक व्यक्त करीत आहेत.




> पुण्यात आंतरराष्ट्रीय उद्योग मोठ्या प्रमाणात आहेत. या उद्योगांनी येथील गुंतवणुकीत वाढ करण्यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ आवश्यक आहे. त्याच वेळी उद्योगांसाठी कार्गो विमानतळाचीही आवश्यकता आहे. त्या दृष्टीने लोकप्रतिनिधींनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणे गरजेचे आहे.
>
> **- प्रशांत गिरबने, महासंचालक, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर**

> जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, पाणी, वीज यासह कचऱ्याची मोठी समस्या आहे. याकडे स्थानिक प्रशासन आणि एमआयडीसीकडून दुर्लक्ष होत आहे. या वसाहतींमध्ये अतिक्रमणे वाढण्यासोबत आगी लागण्याच्या घटना वाढल्या आहेत.
>
> **- अभय भोर, अध्यक्ष, फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन**

# रस्ते विकासाच्या 90 कोटींच्या कामात 'रिंग'

## नऊ रस्ते विकासाच्या 90 कोटी रुपयांच्या निविदांमध्ये संगनमत (रिंग) झाल्याची तक्रार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांतील नऊ रस्ते विकासाच्या ९० कोटी रुपयांच्या निविदांमध्ये संगनमत (रिंग) झाल्याची तक्रार ठेकेदारांनीच केली आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द करून दोषींवर कारवाईची मागणी होत असताना या तक्रारीवरून पालिका प्रशासनाने कागदपत्रांची चौकशी सुरू केली आहे.

महापालिकेने शहरातील विविध भागांतील नऊ रस्त्यांच्या ९० कोटींच्या कामाची निविदा आचारसंहिता लागण्यापूर्वी प्रसिद्ध केली होती. या कामाच्या निविदा प्रक्रियेत अटी-शर्तींची पूर्तता करत नसताना काही ठेकेदार पात्र करण्यात आले. तर, पात्र असूनही काहींना अपात्र करण्यात आल्याचा आरोप करत ठेकेदारांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे लेखी तक्रार केली. त्यानंतर माजी नगरसेवक राहुल कलाटे यांनीही आयुक्त सिंह व शहर अभियंता मकरंद निकम यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यांनी या कामांच्या निविदांमधील त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. काही पात्र ठेकेदारांनी खासगी विकासकाकडे काम केल्याचा पुरावा दाखल केला. कामाचे पुरेसे पुरावे व प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत.



पंधरा वर्षांपासून पालिकेचे काम करणारे ठेकेदार अपात्र ठरविण्यात आले. पात्र केलेल्या ठेकेदारांनी आवश्यक यंत्राची यादी व पुरावे दिलेले नाहीत. काही ठेकेद राजकीय व्यक्तीशी संबंधित असल्याचेही दिसून येते. ठेकेदाराचा स्वतःच्या मालकीचा 'हॉटमिक्स प्लांट' आवश्यक आहे. त्याची पूर्तता केलेली नसताना ठेकेदार पात्र ठरल्याचे दिसते. त्यामुळे याची चौकशी करून निविदा रद्द करावी. खोटी कागदपत्रे सादर करणारे ठेकेदार, त्यांची तपासणी करणारे सल्लागार व अधिकारी यांचे संगनमत असेल, तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी कलाटे यांनी केली.

काही कामांच्या निविदांबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने स्थापत्य विभागामार्फत संबधित पात्र व अपात्र ठेकेदारांच्या कागदपत्रांची तपासणी सुरू आहे. यामध्ये कोणी दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई होईल. चुकीचे आढळल्यास नव्याने निविदा प्रक्रिया राबविली जाईल, असे महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.